नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ११/०५/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत २२ कि.मी अंतरावरील पेटोलपंप ठाणा ते निहारवाणी येथे दिनांक ०६/०५/२२ चे २२.०० ते २२.३० दरम्यान फिर्यादी नामे— निखील मोतीराम चौधरी वय २१ वर्ष रा.निहारवाणी ता. मौदा हा दि ०६/०५/२२ चे रात्री १०.३० वा. दरम्यान घरी हजर आसतांना फिर्यादीचा मित्र आदित्य वाघमारे याने सांगितले की, 'तुझे वडील रस्त्यात जखमी अवस्थेत पडले आहेत' तेव्हा जावून पाहीले असता फिर्यादीचे वडील नामे— मोतीराम संपत चौधरी (जखमी)वय ५० वर्ष रा.निहारवाणी ता. मौदा हे पेट्रोलपंपला जाणाऱ्या रोडवर पडले होते. त्यांच्या डोक्याला, गालाला, डाव्या पायाला मार लागुन रक्त निघत होते. त्यानंतर ॲबुलन्स बोलावुन त्यांना सामान्य रूग्णालय भंडारा येथे उपचाराकामी भर्ती केले व नंतर दि ०८/०५/२२ ला पडोळे हॉस्पीटल नागपुर येथे भर्ती केले. आरोपी क्र. १. संतोश बावणकुडे व एक अज्ञात आरोपीने फिर्यादीचे वडीलांना काठीणे मारले असे जखमीने फिर्यादिस सांगितले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री मोहोड ९३०७५३६३४४ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत मौजा धानोली येथे दिनांक ०३.०५.२२ चे ११.०० ते १०.०५.२०२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— ग.भा. देवकाबाई रंगराळ मस्के वय ६५ वर्ष रा. धानोली यांचे घराचे सामोरील घराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील लोखंडी ड्रम मध्ये ठेवलेली नगदी व सोन्याचे दागिणे असा एकुण कि. ७०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक उमेश इंगळे मो. न. ९९२३४६३४६१ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपी अटक

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील मौजा जवाहर टी पॉईंट खापा येथे दिनांक १०/५/२०२२ चे ०७/५० वा. दरम्यान फिर्यादी यांना गोपणीय मुखबीरव्दारे मिळालेल्या खबरेवरून नाकाबंदी केली असता यातील आरोपी क्र. १) छोटु शंकर मडावी वय ३० वर्ष, रा. जंगली मोहगाव व २) निलेश शेषराव निळे वय ३६ वर्ष, रा. खापा हे आपले एमएच— ४०/बीजी— २७५५ क्रमांकाच्या दहा चक्का ट्रकमध्ये विनापरवाना अवैधरित्या ४ ब्रास रेती कि. ८,०००/—रू. ची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण १०,०८०,००/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे नापोशि संतोष परतेती यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कलेगुरवार मो. नं ९१७५५७९१४३ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर** :— फिर्यादी नामे— सौ माया ईश्वर बांबल, वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६ कळमेश्वर यांचे पती हे दि ०७/०५/२०२२ रोजी नागपुर वरून कळमेश्वरला घरी आले असता त्यांचे नाकातुन रक्त निघत होते व शरीरावर जखमा दिसत होत्या. दिनांक ०७/०५/२०२२ चे २०.०० वा. दरम्याण मौजा फेटरी गाव माहुरझरी रोड येथे फिर्यादीचे पती हे त्यांचे मित्र डोमा यांचेसह उभे असता आरोपी क्र. १. मुकेश ढोमणे रा येरला २. अमीत अखंड रा फेटरी व इतर यांनी 'इथे उभे का आहे', असे म्हणत काही कारण नसतांना हातबुक्कींने मारहाण केली. सदर मारहाणीमध्ये फिर्यादीचे पतीचे डोके, छाती, हातावर, पाठीला मार लागला. दि १०/०५/२०२२ रोजी सकाळी फिर्यादीचे पती यांना त्रास वाढल्याने डॉक्टरांनी एमआर आय काढल्यावर छातीचे दोन हाड फ्रॅक्चर असल्याचे रिपोर्ट वरून गुन्हा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२३, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री गायकवाड मो.नं. ९९२३९८८२९२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**